PRAVARA RURAL EDUCATION SOCITY'S
ARTS,SCIENCE AND COMMERCE
COLLEGE, KOLHAR

In Subject
BUSSINESS FINANCE

Presentation
On topic

# व्यावसायिक वित्ताचा परिचय (Introduction to business finance)

Scanned by CamScanner

# CONTENTS


- प्रस्तावना
- व्यवसायिक वित्ताचा अर्थ आणि व्याख्या
- व्यावसायिक वित्ताची व्याख्या
- व्यावसायिक वित्त पुरवठ्याची उद्दिष्टे
- व्यवसायिक वित्ताचे महत्त्व

# प्रस्तावना (INTRODUCTION)

- वित्त नियोजन हा आपल्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा पैलू आहे. आजच्या जगात सर्व वयोगटातील लोकांसाठी आर्थिक नियोजन आवश्यक आहे.
- आपल्या सर्वांना माहित आहे की, जसे जगण्यासाठी अन्नाची गरज असते, तसेच पैशाचीही गरज असते. जर आपल्याकडे पैसे आहेत तर ते चांगल्या प्रकारे खर्च करणे आणि योग्य गुंतवणूक करणेदेखील आवश्यक आहे.
- खरं तर प्रत्येकाच्या आयुष्यात चढउतार येतच असतात. त्यामुळे जर तुम्ही तुमच्या पैशाचे योग्य नियोजन आधीच ठेवले तर ते तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल.

# व्यवसायिक वित्ताचा अर्थ आणि व्याख्या
# (MEANING AND DEFINITION OF BUSINESS FINANCE)

- वित्त या शब्दाला पैसा म्हणून संबोधले जाते.
- व्यवसायामध्ये पैशाची जी कार्ये आहेत तीच कार्ये वित्त हे व्यवसायामध्ये करते. तसेच त्याचे स्वरूपही सारखेच आहे.
- वित्त म्हणजे व्यवसायासाठी वापरण्यात आलेला पैसा होय, व्यवसायामध्ये वित्ताचा उपयोग भांडवल म्हणून केलेला दिसून येतो. व्यावसायिक वित्त ही व्यापक स्वरूपाची संकल्पना आहे.
- तसेच व्यावसायिक वित्त म्हणजे व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या निधींची जुळवाजुळव करणे होय. यामध्ये व्यावसायिक निधीचे नियोजन, उभारणी आणि प्रशासन या बाबींचा समावेश होतो

# व्यावसायिक वित्त पुरवठ्याची उद्दिष्टे
# (OBJECTIVES OF BUSINESS FINANCE)

- **नवीन व्यवसायाची स्थापना करणे (Establishment of New Business) :.**

व्यावसायिक वित्त-पुरवठ्याचे उद्दिष्ट म्हणजे नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी व्यवसायामध्ये खरेदी करण्यात आलेल्या साधनसामग्रींचा खर्च भागविणे होय. ज्या वेळेस व्यवसाय सुरू केला जातो त्यावेळी व्यवस्थापकांना अनेक प्रकारची कामे पार पाडावी लागतात. यामध्ये कायदेशीर परवानग्या घेणे, वेगवेगळ्या प्रकारची कागदपत्रे गोळा करणे, विविध प्रकारची माहिती मिळविणे इत्यादी. हे सर्व करण्यासाठी व्यावसायिकाला वित्ताची आवश्यकता असते. त्यामुळे नवीन व्यवसायाची स्थापना करण्यासाठी वित्त हा घटक महत्त्वाचा समजला जातो

# व्यावसायिक वित्त पुरवठ्याची उद्दिष्टे
# (OBJECTIVES OF BUSINESS FINANCE)

- **व्यवसायवृद्धी आणि विकासासाठी वित्तपुरवठा (Provide Development Finance) :**

मनुष्य हा विकसित प्राणी आहे. या विकसित प्राण्याने एक व्यवसाय सुरू केल्यानंतर तो व्यवसाय विकसित करण्यासाठी आणि व्यवसायामध्ये नावीन्य आणण्यासाठी व्यावसायिकाला वित्तपुरवठ्याची मोठ्या प्रमाणात गरज भासत असते. त्यामुळे व्यवसायाची वृद्धी होण्यासाठी वित्त हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.


- **कर्मचारी फायदे (Employee Benefits) :**

समाधानी कर्मचारी ही व्यवसायाची मालमत्ता आहे. कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर व्यवसायाचे उत्पादन अवलंबून असते. म्हणूनच कर्मचाऱ्यांना अनेक सुविधा देणे ही व्यवसायाची नैतिक जबाबदारी आहे. त्यासाठी व्यवसायात वित्ताची मोठ्या प्रमाणात गरज आहे.

# वित्तीय नियोजनाची 7 सूत्रं

- आपल्याला सध्याच्या खर्चाचा विचार करतानाच सोबत भविष्यातल्या खर्चांचाही विचार करून त्यानुसार प्लानिंग करायचं आहे. मुलांच्या शाळेच्या फीचं उदाहरण पाहू. आताची फी किती आहे यावरून पुढच्या पाच वर्षांनी शिक्षणाचा हा खर्च किती असेल याचा अंदाज घेऊन तशी तरतूद करायला हवी.
- महागाई, चलनवाढीचा दर याचाही विचार फायनान्शियल प्लानिंग करताना करणं आवश्यक आहे. नोव्हेंबर 2021मध्ये चलनवाढीचा दर 14 टक्क्यांपेक्षा जास्त होता. दर वेळी महागाईचा दर इतका चढा नसला तरी अनेकदा तो 10 टक्क्यांपेक्षा जास्त असतो. त्यामुळे भविष्यात हा तर किती असू शकेल, याचा विचार आता गुंतवणूक करताना केला पाहिजे.

# व्यवसायिक वित्ताचे महत्त्व
# (IMPORTANCE OF BUSINESS FINANCE)




आकृती क्र. 1.3 : व्यवसायात वित्ताचे महत्त्व

# व्यवसायिक वित्ताचे महत्त्व
# (IMPORTANCE OF BUSINESS FINANCE)

- **व्यवसायाची जीवन रक्तवाहिनी (Life Blood of Business) :**

व्यावसायिक वित्त हे व्यवसायाची रक्तवाहिनी आहे असे समजले जाते. मानवाच्या शरीरामध्ये ज्याप्रमाणे रक्तवाहिन्यांचे कार्य चालते त्याचप्रमाणे व्यवसायामध्ये देखील वित्ताचे कार्य असलेले दिसून येते. त्याचा परिणाम व्यवसायाच्या आर्थिक घटकांवर होतो.

- **व्यवसायाचा विस्तार :**

मनुष्य हा विकसित प्राणी आहे. या विकसित प्राण्यांने एक व्यवसाय सुरू केल्यानंतर तो व्यवसाय विकसित करण्यासाठी आणि व्यवसायामध्ये नावीन्य आणण्यासाठी व्यावसायिकाला वित्तपुरवठ्याची मोठ्या प्रमाणात गरज भासत असते.

# व्यवसायिक वित्ताचे महत्त्व
# (IMPORTANCE OF BUSINESS FINANCE)

- **व्यवसायाची निर्मिती :**

व्यावसायिक वित्तपुरवठ्याचे प्राथमिक उद्दिष्ट म्हणजे नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी व्यवसायामध्ये खरेदी करण्यात आलेल्या साधनसामग्रीचा खर्च भागविणे होय. ज्या वेळेस व्यवसाय सुरू केला जातो त्या वेळी व्यवस्थापकांना अनेक प्रकारची कामे पार पाडावी लागतात. यामध्ये कायदेशीर परवानग्या घेणे, वेगवेगळ्या प्रकारची कागदपत्रे गोळा करणे, विविध प्रकारची माहिती मिळविणे इत्यादी. हे सर्व करण्यासाठी व्यावसायिकाला वित्ताची आवश्यकता असते. त्यामुळे नवीन व्यवसायाची स्थापना करण्यासाठी वित्त हा घटक महत्त्वाचा समजला जातो.

- **नावीन्यपूर्ण कल्पना :**

व्यवसायामध्ये काहीतरी नावीन्य घडवून आणणे हे महत्त्वाचे समजले जाते. नवीन व्यवसायाचा विस्तार करणे, नवीन प्रकल्प विकसित करणे यासाठी व्यवसायामध्ये वित्त फार महत्त्वाची भूमिका बजावित असते

# व्यवसायिक वित्ताचे महत्त्व
# (IMPORTANCE OF BUSINESS FINANCE)

- **व्यवसाय चक्र :**

अर्थव्यवस्थेमधील बदलांमुळे आणि इतर बाह्य घटकांमुळे होणारी वाढ, तेजी, मंदी, औदासीन्य आणि नूतनीकरणाचे व्यवसाय चक्र एक वास्तविकता आहे आणि ते कितीही चांगले करीत असले तरी त्याचा परिणाम व्यवसायाला सहन करावा लागतो आणि या चक्रांना सोडविण्यासाठी तयार राहावे लागते, आर्थिक योजना चुकीच्या नसल्या पाहिजेत आणि जेव्हा व्यवसायामुळे आर्थिक संकट कोसळते तेव्हा आर्थिक योजनांचा त्यात समावेश असावा.

- **कर्ज गुणोत्तरांचे महत्त्व :**

आपल्या हातात पैशांपेक्षा अर्थसंकल्प जास्त असतात. बहुतेक व्यवसायांमध्ये काही प्रमाणात कर्ज असते. विशेषतः सुरुवातीच्या काळात महसूल आणि मालमत्तेच्या तुलनेत बरेच कर्ज आपल्या कर्जाची देयके देण्यापेक्षा आपल्यापुढे अधिक समस्या निर्माण करतात. व्यवसायात आवक व जावक गुणोत्तर हे महत्त्वाचे आहे. पुरवठादारांकडून उधारीवर माल घेणे आणि विक्रेत्यांना मर्यादित उधारीच्या अटी घालणे हे महत्त्वाचे आहे. कर्जाऊ भांडवलाच्या कंपन्यांसह गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी आणि व्यावसायिक जागा संपादन किंवा भाड्याने घेण्याच्या आपल्या क्षमतेवर कर्जाचे प्रमाण प्रभावित करू शकते.

# THANK YOU ☺